# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः07.06.2024** **वारः शुक्रवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर नवी दिल्लीत सत्ता स्थापनेच्या हलचालींना वेग
2.सत्ताधारी आणि विरोधी आघाडीच्या घटक पक्षांमध्ये चर्चा आणि बैठकांचं सत्र सुरू; एनडीएच्या संसदीय पक्षाची आज बैठक
3.रिझर्व्ह बँक 2024-25 या वर्षासाठीचं दुसरं द्वैमासिक पतधोरण आज जाहीर करणार
4.वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत अमेरिकेकडून पाकिस्तानचा पराभव
5.देशाच्या मध्य आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये येत्या चार दिवसांत मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा

**नड्डा बैठक**
केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएचं सरकार स्थापन होणार हे स्पष्ट झाल्यानंतर काल नवी दिल्लीत त्या दिशेनं आघाडीच्या गोटात हालचालींना वेग आला होता. भाजप अध्यक्ष जे.पी नड्डा यांनी काल त्यांच्या निवासस्थानी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर बैठक घेतली. या बैठकीला अमित शहा, राजनाथ सिंह, पियूष गोयल, प्रल्हाद जोशी, मनसुख मांडवीय, अश्विनी वैष्णव, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुग, विनोद तावडे आदी नेते उपस्थित होते. संयुक्त जनता दलाचे नेते आणि बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानीही त्यांच्या पक्षाचे अनेक नेते दाखल झाले आहेत. आज नवी दिल्लीत एनडीएच्या संसदीय पक्षाची बैठक होणार आहे. भाजपसह आघाडीतील - तेलुगू देसम,जदयु, लोजपा, शिवसेना, धर्मनिरपेक्ष जनता दल वगैरे इतर घटक पक्षांचे नवनिर्वाचित खासदार या बैठकीला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. एनडीएच्या बैठकीपूर्वी आज सकाळी संयुक्त जनता दलाचीही बैठक होणार आहे.

**इंडियाआघाडीबैठका**
लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पुढील रणनीती आखण्यासाठी इंडिया आघाडीच्या नेत्यांनी काल नवी दिल्लीत अनेक बैठका घेतल्या. तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी आणि पक्षाचे नेते डेरेक ओब्रायन यांनी समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांची भेट घेतली तर आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभा खासदार राघव चढ्ढा यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांची भेट घेतली.

जगभरातून-शुभेच्छा
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्या वेळी लोकसभा निवडणुकीत यश मिळाल्याबद्दल यूक्रेनचे राष्ट्रपति व्लोदीमीर झेलेनस्की आणि आर्मेनिया चे पंतप्रधान निकोल पाशिनयान यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. नेपाळ सरकारच्या प्रवक्त्या आणि माहिती आणि दळणवळण मंत्री रेखा शर्मा यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती दिली.

**युक्रेन अध्यक्ष**
युक्रेन चे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेंस्की यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना युक्रेन भेटीच आमंत्रण दिलं आहे. नुकत्याच निवडणुकीमध्ये झालेल्या विजयाबद्दल अभिनंदन करण्यासाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी झेलेंस्की यांनी पंतप्रधान मोदीशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला होता. भारतीय नागरिकांप्रती मोदी यांची असलेली सहकारी भावना कायम राहावी अशी इच्छाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. वैश्विक शांतता परिषदेतील भारताच्या योगदानच महत्व झेलेंस्की यांनी अधोरेखित केलं. भारताच्या सर्वोच्च पातळीवरील सहभागाचं महत्व वाढण्यावरही झेलेन्स्कि यांनी जोर दिला.

**राहुलगांधी**
४ जूनच्या शेअर बाजारातील घसरणीची संयुक्त संसदीय समितीद्वारे चौकशी करण्याची मागणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल केली. नवी दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात माध्यमांना संबोधित करताना गांधी म्हणाले की या घसरणीमुळे किरकोळ गुंतवणूकदारांचं 30 लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे.

पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या पाच कोटी कुटुंबांना गुंतवणुकीचा विशिष्ट सल्ला का दिला हे जाणण्याची आवश्यकता असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, भाजपने काँग्रेसचे दावे फेटाळून लावले आहेत. राहुल गांधी बाजारातील गुंतवणूकदारांना फसवण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप भाजपचे ज्येष्ठ नेते पियुष गोयल यांनी नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केला. निवडणुकीच्या निकालाच्या दिवशीही लोकांना फायदा झाला आहे असं प्रतिपादन गोयल

यांनी केलं. परदेशी लोकांचे नुकसान झाले आहे तर भारतीय गुंतवणूकदारांना फायदा झाला आहे, 10 वर्षांपूर्वी यूपीए सरकारच्या काळात देशाचं बाजारातील भांडवल 67 लाख कोटी रुपये होतं आणि आज तेच 415 लाख कोटी रुपयांवर गेलं आहे असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**आरबीआय**

रिझर्व्ह बँक आज या आर्थिक वर्षातील आपले दुसरे द्विमासिक पतधोरण जाहीर करणार आहे. आर बी आई च्या पतधोरण समितीची 3 दिवसीय बैठक 5 जूनपासून मुंबईत झाली. एप्रिलमधील शेवटच्या बैठकीत आरबीआयने रेपो दरात कोणताही बदल न करता तो साडे 6 टक्के ठेवला होता. या वेळीही रिझर्व्ह बँक सर्व प्रमुख व्याजदर कायम ठेवेल असा तज्ञाचा अंदाज आहे.

**शिवाजी प्रदर्शन**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या 350व्या शिवराज्याभिषेक दिनाचं औचित्य साधून नवी दिल्लीतील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्र आणि आधुनिक कला दालनामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. सांस्कृतिक मंत्रालय सचिव गोविंद मोहन यांच्या हस्ते या प्रदर्शनाच उद्घाटन करण्यात आलं. हे प्रदर्शन 21 जून पर्यन्त सर्वांसाठी  खुलं राहणार आहे. युवा पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचं शौर्य, साहस आणि देशाच्या सागरी इतिहासाविषयी महत्वपूर्ण माहिती या प्रदर्शनाच्या माध्यमातून मिळणार असल्याचं गोविंद मोहन यांनी यावेळी बोलताना सांगितलं. या प्रदर्शांनातील सर्व चित्र, चित्रकार दीपक गोरे यांनी सुप्रसिद्ध इतिहासकार आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे अभ्यासक दिवंगत बाबासाहेब पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली संग्रहीत केलेली आहेत.

**नेदरलँड्स निवडणुका**

यूरोपीयन यूनियन मधील चार दिवसीय संसदीय निवडणुकांना नेदरलँड्स मध्ये काल सुरुवात झाली. इतक्या लवकर निवडणुका सुरू करणारा नेदरलँड्स हा यूरोपीयन यूनियन मधला पहिला देश असून यानंतर आयर्लंड मध्ये निवडणुका होणार आहेत. यूरोपीयन यूनियन मधील उर्वरित देशांच्या निवडणूका येत्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी होणार आहेत. सर्व देशांमधील मतदान पूर्ण झाल्यानंतर, येत्या रविवारी निकाल जाहीर होतील. या निवडणुकांमध्ये 40 कोटी मतदार यूरोपीयन संसदेच्या 720 उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत. जागतिक हवामान धोरणं, संरक्षण, स्थलांतर आणि चीन तसंच अमेरिका यांच्याशी असलेले भू-राजकीय संबंध ह्या मुद्द्यांवर यंदाची निवडणूक होणार आहे.

**सुदानहल्ला**

सुदानमध्ये,बुधवारी मध्य अल-जझिरा राज्यातल्या वड अल-नूर या गावात बंडखोर निमलष्करी दलाच्या हल्ल्यात किमान दीडशे लोक ठार आणि 200 जण जखमी झाले. स्थानिक अधिकारी आणि ही घटना प्रत्यक्ष बघणाऱ्या लोकांच्या म्हणण्यांनुसार 40 हून अधिक सशस्त्र वाहनांनी गावात घुसून तिथल्या रहिवाशांवर हल्ला केला. यामध्ये मुलं आणि महिलांसह अनेक नागरिक ठार झाले. या हल्ल्यात 35 मुलांचा मृत्यू झाला असून 20 हून अधिक मुलं जखमी झाली आहेत असं यूनेस्कोनं म्हटलं आहे. सुदानच्या सरकारनं या हल्ल्याचा आंतरराष्ट्रीय पातळीवर निषेध करण्याचं आवाहन केलं आहे. मागील वर्षी एप्रिल मध्ये संघर्ष सुरू झाल्यापासून सुदानमध्ये 15 हजाराहून अधिक लोक मारले गेल्याचा अंदाज आहे.

**इंडोनेशिया ओपन**

जकार्ता मध्ये सुरू असलेल्या इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरि सामन्याच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या लक्ष्य सेन चा सामना डेन्मार्क च्या एंडर्स एण्टोंसन बरोबर होणार आहे. काल लक्ष्य सेननं उप - उपांत्यपूर्व सामन्यात जपानच्या केंता निशिमोतो चा 21-9, 21-15 असा पराभव केला होता.

**विश्वचषक**

वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल अमेरिकेनं पाकिस्तानचा सुपर ओवर मध्ये  5 धावांनी पराभव केला. पाकिस्तान नं 7 गडी बाद 159 धावांचं  आव्हान अमेरिकेसमोर ठेवलं होतं. अमेरिकेनं निर्धारित 20 षटकात धावांची बरोबरी केल्यानं सुपर ओवर देण्यात आली. त्यामध्ये अमेरिकेनं 1 गडी बाद 18 धावा केल्या तर पाकिस्तानला मात्र एक गडी बाद 13च धावा करता आल्या. पाकिस्तान कडून बाबर आजम नं 44 धावा केल्या तर अमेरिकेच्या मोनांक पटेल यानं सर्वाधिक 50 धावा केल्यानं त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं. या स्पर्धेत येत्या रविवारी न्यूयोर्कमध्ये भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे.

**मान्सून**

देशाच्या मध्य आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये  येच्या चार दिवसांत मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान ,  मान्सून काल महाराष्ट्रासह कर्नाटकसह काही भागात दाखल झाला. कोकणातील रत्नागिरी, तसंच  सोलापूरसह काही भागात मान्सून पोहोचल्याचं हवामान खात्याच्या पुणे शाखेचे प्रमुख डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांनी समाज माध्यमावरून दिली. येत्या 24 तासात कोकण गोव्यासह गुजरात आंध्र प्रदेश आणि तेलंगण राज्यात अनेक ठिकाणी सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.